मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# थकबाकीदारांवर 1 ऑक्टोबरपासून जप्तीचा दणका!

## मालमत्ता कर वसुलीसाठी महापालिकेची धडक मोहीम; ३० सप्टेंबरपर्यंत नोटिसा

» पिंपरी | प्रतिनिधी

**आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने १३०० कोटींचे मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी थकबाकीदारांवर नियोजनबद्ध पद्धतीने कारवाई करण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिले. विशेषतः बिगरनिवासी व औद्योगिक मालमत्तांच्या थकबाकी वसुलीला प्राधान्य देत स्वतंत्र वसुली पथके तयार करून कारवाईची प्रक्रिया सुरू करावी, अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या मालमत्ता कर वसुलीच्या अनुषंगाने आढावा बैठक आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या सूचनेनुसार महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात पार पडली. यावेळी अतिरिक्त आयुक्त सांडभोर बोलत होत्या. बैठकीला उपायुक्त सचिन पवार यांच्यासह कर आकारणी व कर संकलन विभागाचे प्रशासन अधिकारी, मुख्य कार्यालयातील अधिकारी, सर्व १८ क्षेत्रीय कार्यालयांतील मंडल अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त सांडभोर म्हणाल्या, ज्या मालमत्ताधारकांना मालमत्ता कराची बिले बजावण्यात आली आहेत, मात्र अद्याप कराचा भरणा करण्यात आलेला नाही, अशा मालमत्तांची स्वतंत्रपणे नोंद घेण्यात यावी. संबंधित मालमत्ताधारकांशी संपर्क साधून कर भरण्याबाबत आवश्यक मार्गदर्शन करावे. तसेच थकबाकी वसुलीसाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असेदेखील त्यांनी सांगितले. ३० सप्टेंबरपर्यंत कर वसुलीच्या मोहिमेला विशेष गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

तसेच बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र, मोकळ्या जागा तसेच इतर मालमत्ताधारकांची यादी तयार करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तसेच, ज्या मालमत्ताधारकांकडे मालमत्ता कराची थकबाकी आहे, त्यांना ३० सप्टेंबरपूर्वी नोटिसा बजावून, १ ऑक्टोबरपासून जप्तीची कारवाई सुरू करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाने आपल्या कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर वसुलीचे सूक्ष्म नियोजन करावे. कोणत्या प्रकारच्या मालमत्तांकडून किती थकबाकी आहे, कोणत्या मालमत्ताधारकांना बिले बजावण्यात आली आहेत आणि अद्याप भरणा झालेला नाही, याची माहिती अद्ययावत ठेवून त्यानुसार वसुलीची कार्यवाही करावी, असेही अतिरिक्त आयुक्त सांडभोर यांनी स्पष्ट केले.

ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कराचा भरणा केलेला नाही, त्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता ऑनलाइन पद्धतीने कराचा भरणा करावा आणि ४ टक्के सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केले आहे. अधिकाधिक नागरिकांनी वेळेत मालमत्ता कर भरून सवलत योजनेचा लाभ घ्यावा, तसेच महापालिकेच्या कर वसुली प्रक्रियेस सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

### आतापर्यंत ५८४ कोटी ४९ लाख रुपयांचा भरणा

महापालिकेने चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मालमत्ता कर वसुलीचे १३०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. १ एप्रिल २०२६ ते १० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १२ वाजेपर्यंत ५८४ कोटी ४९ लाख ४५ हजार २२८ रुपयांचा मालमत्ता कर भरणा झाला आहे. महापालिकेच्या वतीने मालमत्ता कर वेळेत भरणाऱ्या नागरिकांसाठी सवलत योजना लागू करण्यात आली आहे. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत मालमत्ता कर ऑनलाइन भरल्यास सामान्य करावर ४ टक्के सवलत देण्यात येत आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी आता शेवटचे २० दिवस शिल्लक आहेत.

# गणेशोत्सवासाठी महापालिका सज्ज; १११ मंडळांना परवाने!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने गणेशोत्सव २०२६ च्या अनुषंगाने शहरातील गणेश मंडळांना परवाने देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. क्षेत्रीय कार्यालयनिहाय आतापर्यंत एकूण १११ गणेश मंडळांना परवाने देण्यात आले आहेत. तसेच गणेशमूर्ती विसर्जनासाठी शहरात एकूण १०४ विसर्जन ठिकाणांची व्यवस्था करण्यात आली आहे.**



क्षेत्रीय कार्यालयनिहाय परवानगी देण्यात आलेल्या गणेश मंडळांची संख्या पुढीलप्रमाणे आहे – ब क्षेत्रीय कार्यालय २३, क क्षेत्रीय कार्यालय २, ड क्षेत्रीय कार्यालय १६, इ क्षेत्रीय कार्यालय १५, फ क्षेत्रीय कार्यालय १७, ग क्षेत्रीय कार्यालय २०, ह क्षेत्रीय कार्यालय १५, ज क्षेत्रीय कार्यालय २ आणि ल क्षेत्रीय कार्यालय १, अशी एकूण १११ मंडळांना परवानगी देण्यात आली आहे.

गणेशमूर्ती विसर्जनासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय अ क्षेत्रीय कार्यालय १०, ब १४, क १२, ड १२, इ १३, फ ११, ग ६, ह १२, ज ९ आणि ल ५ अशा एकूण १०४ विसर्जन ठिकाणांची व्यवस्था करण्यात आली आहे.

गणेशोत्सव काळात नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, तसेच गणेशमूर्तींचे विसर्जन सुरक्षित व पर्यावरणपूरक पद्धतीने करता यावे, यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी महानगरपालिकेने उपलब्ध करून दिलेल्या विसर्जन ठिकाणांचा वापर करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

""गणेशोत्सव हा आपल्या शहरातील नागरिकांच्या श्रद्धा आणि उत्साहाचा सण आहे. हा उत्सव आनंदमय, शिस्तबद्ध आणि सुरक्षित वातावरणात पार पडावा, यासाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. गणेश मंडळांना परवाने देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, विसर्जनासाठीही मोठ्या प्रमाणात व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशमूर्तींचे विसर्जन करून महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे.""

- रवि लांडगे, महापौर

""गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सोयीसाठी महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या माध्यमातून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. गणेश मंडळांना परवाने देण्यासोबतच विसर्जनासाठी १०४ ठिकाणी व्यवस्था करण्यात आली आहे. विसर्जनाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत."

- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त

# विद्यार्थ्यांनी दिला पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा धडा!

## मानवी साखळीतून नागरिकांमध्ये पर्यावरणाची जनजागृती

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'इ' क्षेत्रीय कार्यालय, प्रभाग क्रमांक ५ येथील एसपीजी इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजआळंदी रोड, भोसरी येथील विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेश प्रतिमा तयार करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. तसेच मानवी साखळीच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करत हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला.**

महापौर रवि लांडगे, उप महापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली 'माझी वसुंधरा ७.०' तसेच 'स्वच्छ सर्वेक्षण २०२६' अभियानांतर्गत शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. गणेशोत्सवाच्या काळात पर्यावरणाचे रक्षण, स्वच्छता आणि प्लास्टिकमुक्त उत्सवाचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांच्या सहभागातून हा जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आला.

"गणेशोत्सवाची भक्ती, परंपरा आणि उत्साह कायम ठेवत पर्यावरणाचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची जाणीव निर्माण झाल्यास त्याचा सकारात्मक संदेश त्यांच्या कुटुंबापर्यंत आणि पुढे संपूर्ण समाजापर्यंत पोहोचतो. पर्यावरणाचे संवर्धन, स्वच्छता आणि प्लास्टिकचा वापर टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी तसेच नागरिकांनी सक्रियपणे पुढाकार घ्यावा. नागरिकांच्या सहभागातूनच पर्यावरणपूरक आणि स्वच्छ गणेशोत्सव साजरा करणे शक्य होईल," असे उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

### मानवी साखळीच्या माध्यमातून जनजागृती:

गणेशोत्सवात प्लास्टिकचा वापर टाळावा, नैसर्गिक व पर्यावरणपूरक सजावटीला प्राधान्य द्यावे आणि परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी हरित शिक्षक शपथ घेण्यात आली तसेच स्वच्छतेच्या घोषणांद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.



# नवीन ड्रेनेज वाहिनीच्या कामाला वेग; नागरिकांना मोठा दिलासा!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**प्रभाग क्रमांक ५ मधील पोटे चाळ परिसरातील नागरिकांना गेल्या काही काळापासून ड्रेनेजच्या गंभीर समस्येचा सामना करावा लागत होता. सांडपाण्याचा योग्य निचरा न होणे आणि वारंवार तुंबणाऱ्या ड्रेनेजमुळे येथील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले होते. नागरिकांची ही गैरसोय लक्षात घेऊन स्थानिक नगरसेविका कविता भोंगाळे यांनी तातडीने पाठपुरावा करत या भागात नवीन ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाला सुरुवात करून दिली आहे.**





सध्या पोटे चाळ परिसरात नवीन ड्रेनेज पाईपलाईन टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. गेल्या काही काळापासून परिसरातील नागरिकांना ड्रेनेजच्या समस्येमुळे मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत होते. सांडपाण्याचा योग्य पद्धतीने निचरा होत नसल्याने अनेकदा ड्रेनेज तुंबण्याच्या घटना घडत होत्या. त्यामुळे परिसरात दुर्गंधी, अस्वच्छता तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत होता. नागरिकांना भेडसावत असलेल्या या समस्येची गंभीरता लक्षात घेऊन नगरसेविका कविता भोंगाळे यांनी तातडीने पाठपुरावा करत नवीन ड्रेनेज वाहिनी टाकण्याचे काम मार्गी लावले आहे.

या कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी नगरसेविका कविता भोंगाळे यांनी घटनास्थळी भेट देत सुरू असलेल्या कामाची पाहणी केली आणि कामाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी संबंधित महापालिका अधिकारी, कर्मचारी तसेच ठेकेदाराकडून कामाची सद्यस्थिती, पाईपलाईनची आखणी, कामाची प्रगती आणि पुढील नियोजनाबाबत माहिती घेतली. परिसरातील नागरिकांना भविष्यात पुन्हा ड्रेनेजच्या समस्येला सामोरे जावे लागू नये, याहष्टीने काम योग्य पद्धतीने पूर्ण करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

ड्रेनेज पाईपलाईन टाकण्याचे काम करताना आवश्यक तांत्रिक बाबींची योग्य पद्धतीने पूर्तता करावी, पाईपलाईनची गुणवत्ता आणि कामाचा दर्जा कोणत्याही परिस्थितीत कमी होणार नाही, याची दक्षता घ्यावी, तसेच कामामध्ये अनावश्यक विलंब होऊ नये, अशा स्पष्ट सूचना नगरसेविका कविता भोंगाळे यांनी संबंधित अधिकारी आणि ठेकेदाराला दिल्या. कामाच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षितता राखावी, रस्त्यावर अथवा नागरिकांच्या ये-जा करण्याच्या मार्गावर अडथळा निर्माण होणार नाही, याचीही काळजी घ्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. नागरिकांना कमीत कमी त्रास होईल, याची काळजी घेत काम नियोजनबद्ध आणि वेगाने पूर्ण करण्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

नवीन ड्रेनेज वाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर पोटे चाळ परिसरातील सांडपाण्याचा योग्य पद्धतीने निचरा होण्यास मोठी मदत होणार आहे. वारंवार तुंबणाऱ्या ड्रेनेजमुळे निर्माण होणारी दुर्गंधी, सांडपाणी रस्त्यावर येण्याची समस्या आणि त्यामुळे निर्माण होणारी अस्वच्छता कमी होण्यास मदत होणार आहे. यामुळे परिसरातील स्वच्छता आणि नागरिकांचे आरोग्य यामध्येही सकारात्मक बदल होण्याची अपेक्षा आहे.

> "पोटे चाळ भागातील नागरिकांना ड्रेनेजच्या समस्येमुळे मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. नागरिकांना भेडसावणारी ही समस्या कायमस्वरूपी दूर होऊन परिसरातील रहिवाशांना दिलासा मिळावा, यासाठी नवीन ड्रेनेज लाईनचे काम हाती घेण्यात आले आहे. हे काम तांत्रिकदृष्ट्या योग्य पद्धतीने आणि गुणवत्तापूर्ण रीतीने पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. प्रभागातील नागरिकांच्या दैनंदिन समस्या सोडवून परिसराचा सर्वांगीण विकास साधणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे."
>
> –कविता भोंगाळे, नगरसेविका

# 35 वर्षांचा संघर्ष; कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांचा दिमाखात सन्मान!

## राहुल नार्वेकर यांच्या हस्ते विशेष गौरव; कामगार चळवळीतील योगदानाचा सन्मान

**पिंपरी | प्रतिनिधी**

**कामगार आणि श्रमिकांच्या हक्कासाठी गेल्या ३५ वर्षांपासून सातत्याने संघर्ष करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत, राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष तथा कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांचा मराठी पत्रकार संघाच्या वतीने महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुलजी नार्वेकर यांच्या हस्ते (दि.८) स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन विशेष सन्मान करण्यात आला.यावेळी सोहळ्यात संघटनेच्या सभासदांनी व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या जल्लोषात आनंद व्यक्त केला.**



मराठी पत्रकार संघाच्या वतीने ऑटो क्लस्टर सभागृहामध्ये एका विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुलजी नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला.पद्मश्री गिरीशजी प्रभुणे,विधान परिषदेचे आमदार श्री अमितजी गोरखे, पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ.विजयजी सूर्यवंशी, दैनिक लोकमतचे संपादक संजयजी आवटे यांनी कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांच्या कार्याचे कौतुक केले व पत्रकार संघाने योग्य निवड या सन्मानासाठी केली याकरिता समाधान व्यक्त केले.

कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ कष्टकरी, कामगार आणि श्रमिकांच्या हक्कासाठी, न्याय्य मागण्यांसाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत लढाऊ व निस्वार्थपणे काम केले आहे. राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी राज्यभरातील कामगार वर्गात एक हक्काचा आणि विश्वासाचा चेहरा म्हणून ओळख निर्माण केली असून कामगार आणि कंपन्यांमधील व्यवस्थापनामध्ये समन्वय साधत असतानाच, कर्मचाऱ्यांना त्यांचे कायदेशीर हक्क, योग्य वेतन आणि योग्य न्याय कायदेशीर मार्गाने मिळवून दिला आहे.

कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी सातत्याने घेतलेले श्रम आणि विविध पातळ्यांवर दिलेला लढा हा कामगार चळवळीसाठी प्रेरणादायी ठरला आहे. त्यांच्या याच निष्ठावान आणि कर्तृत्ववान सामाजिक कार्याचा गौरव म्हणून मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले. कामगार चळवळीला नवी दिशा देणारे आणि तळागाळातील घटकांना न्याय मिळवून देणारे एक अभ्यासू व आक्रमक नेते म्हणून त्यांची महाराष्ट्रभर ओळख आहे. हा बहुमोल पुरस्कार आयुष्यातील अत्यंत आठवणीत राहणारा आणि प्रदीर्घ संघर्षाची पावती देणारा क्षण असल्याची भावना कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी यावेळी व्यक्त केली.

तसेच, राजकीय संपादिका (मुंबई) श्रीमती मृणालिनी नानिवडेकर, दै. पुढारीचे संपादक श्री. सुनीलजी माळी, न्यूज १८ मराठी मुंबईचे सहसंपादक श्री. विशालजी परदेशी, सकाळ पुणेचे ज्येष्ठ पत्रकार श्री. राज काची, आणि लेटसअप पुणेचे संपादक श्री. योगेशजी कुटे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. त्यांनी विधानसभा अध्यक्ष मा. श्री. राहुलजी नार्वेकर यांची 'आमदारांचे हेडमास्टर' या विषयावर विविध मुद्द्यांवर प्रकट मुलाखत घेतली, ज्याला उपस्थितांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

विधानसभा अध्यक्ष मा.श्री राहुल जी नार्वेकर, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ विजयजी सूर्यवंशी, एस एम बी पी स्कूल चे चेअरमन डॉक्टर डी के भोसले, ऑटो संघटनेचे अध्यक्ष श्री बाबा कांबळे, दान से उडान चे संस्थापक श्री रवी घाटे, आवटी ग्रुप चे चेअरमन श्री बाबासाहेब आवटी यांचाही विशेष सन्मान देऊन यावेळी गौरवण्यात आले.

हा भव्य व अद्वितीय सोहळा यशस्वी करण्यासाठी मराठी पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष श्री किरणजी जोशी, प्रदेश उपाध्यक्ष श्री. विवेकजी इनामदार, आणि प्रदेश सचिव श्री. हरिभाऊ प्रक्षाळे यांनी अत्यंत सुंदर व नेटके नियोजन केले होते. कामगारांच्या हक्कासाठी ३५ वर्षे अविरत लढा देणाऱ्या श्री. यशवंतभाऊ भोसले यांचा झालेला हा सन्मान राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या प्रत्येक कार्यकर्त्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण ठरला आहे. या समारंभात विशेष सन्मान केल्याबद्दल आयोजकांचे व सर्व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# संस्कारक्षम तरुणाई घडवा - नंदकुमार सातुर्डेकर

**पिंपरी | प्रतिनिधी**

**देशाची सद्यस्थिती पाहता राजकारण्यांचे तरुणांच्या समस्यांकडे लक्ष नाही. शिक्षण क्षेत्रात अनागोंदी वाढली आहे. प्रवेशाबाबत अडचणी, नीट सारख्या परीक्षांचा घोळ या सर्व अडचणीतून शिक्षण घेऊन पुढे बेकारीचे संकट, बोकाळलेला भ्रष्टाचार यामुळे तरुण वर्ग नैराश्याच्या खाईत लोटला जात आहे हजारो तरुण व्यसनाच्या आहारी जात आहेत. काही आत्महत्या करत आहेत. नैराश्य अवस्थेतून तरुणांना बाहेर काढण्यासाठी संस्कारांची गरज आहे हे काम शिक्षकच करू शकतील असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांनी येथे केले.**



मराठवाडा प्रतिष्ठान पिंपरी-चिंचवड यांच्या वतीने चिखली येथील देवगिरी इंग्लिश मीडियम स्कूल आणि मातोश्री प्राथमिक विद्यामंदिर या शाळांमधील शिक्षकांचा शिक्षक दिनानिमित्त विशेष सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांच्या हस्ते शिक्षकांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. शिक्षकांच्या कार्याचा सन्मान आणि त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर बोलत होते. कार्यक्रमास मराठवाडा प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक कुमार जाधव, उपाध्यक्ष उत्तम दंडीमे, लक्ष्मण लिंबापुरे, संचालिका स्मिता जाधव, प्रीती शिंदे, पूजा जाधव, प्रिन्सिपल शहिदा सय्यद आदी उपस्थित होते. शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांचा सन्मान करण्यात आल्याने कार्यक्रमाला उत्साहाचे वातावरण होते.

यावेळी बोलताना नंदकुमार सातुर्डेकर म्हणाले की, भारतीय संस्कृतीमध्ये कृतज्ञतेला अनन्यसाधारण महत्त्व असून गुरुंना अत्यंत मानाचे स्थान देण्यात आले आहे. 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव' या संस्कारातून आपल्या संस्कृतीने गुरुंचे महत्त्व अधोरेखित केले आहे. स्वामी विवेकानंद यांनी 'जीवनाची परिपक्वता म्हणजे शिक्षण' असे म्हटले आहे. विद्यार्थ्यांमध्ये ही जीवनाची परिपक्वता, विचार करण्याची क्षमता आणि योग्य-अयोग्याची जाणीव निर्माण करण्यासाठी जे शिक्षक सातत्याने प्रयत्न करतात, तेच खऱ्या अर्थाने गुरु ठरतात.

पूर्वीच्या काळात ऋषी-मुनींच्या गुरुकुल पद्धतीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जात होता. मात्र, कालानुरूप शिक्षण पद्धतीमध्ये मोठे बदल झाले आहेत. विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून अनेक ठिकाणी शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थ्याच्या वैयक्तिक गरजा, अडचणी आणि कौटुंबिक परिस्थितीकडे अपेक्षित लक्ष देणे कठीण होत आहे. त्यामुळे शिक्षकांसमोरील जबाबदारी अधिक वाढली आहे.

आजच्या काळात अनेक कुटुंबांमध्ये आई-वडील दोघेही नोकरी किंवा व्यवसायात व्यस्त असल्याने त्यांना मुलांसोबत पुरेसा वेळ घालवता येत नाही. अशा परिस्थितीत मुलांच्या जडणघडणीसाठी शिक्षकांकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले जाते. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देणे एवढीच शिक्षकांची भूमिका नसून, त्यांच्यामध्ये चांगले संस्कार, सामाजिक भान, शिस्त, जबाबदारीची जाणीव आणि माणुसकीची मूल्ये रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिक्षकांना करावे लागते.

# चाकण एमआयडीसीत भीषण आग!

## चार अग्निशमन यंत्रणांच्या संयुक्त प्रयत्नांनी आगीवर नियंत्रण

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**चाकण एमआयडीसी परिसरातील चिंबळी फाटा येथे पॉलिमार्क इंडस्ट्रीज कंपनीला बुधवारी (दि. ९) सकाळी अचानक भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. कंपनीत पॅकेजिंगसाठी वापरण्यात येणारे साहित्य मोठ्या प्रमाणात असल्याने आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केले. आगीच्या उंचच उंच ज्वाळा आणि धुराचे प्रचंड लोट दूरवरून दिसत होते. आग लगतच्या कंपन्यांपर्यंत पोहोचण्याचा धोका निर्माण झाल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली होती. मात्र, घटनेची माहिती मिळताच विविध अग्निशमन यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत संयुक्तपणे केलेल्या शर्थीच्या प्रयत्नांमुळे आग नियंत्रणात आणण्यात यश आले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.**







पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चिंबळी फाटा येथील शांताई लॉन्सजवळ पॉलिमार्क इंडस्ट्रीज कंपनी आहे. बुधवारी सकाळच्या सुमारास कंपनीत अचानक आग लागली. कंपनीमध्ये पॅकेजिंगसाठी वापरण्यात येणारे ज्वलनशील साहित्य असल्याने आगीचा भडका काही क्षणांतच वाढला. आगीने उग्र रूप धारण करताच परिसरात धुराचे मोठे लोट पसरले. आगीच्या ज्वाळा मोठ्या प्रमाणात उसळत असल्याने आसपासच्या कंपन्यांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) मारुंजी आणि वाघोली अग्निशमन केंद्रातील जवान अग्निशमन वाहनांसह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. आगीची व्याप्ती मोठी असल्याचे लक्षात येताच पिंपरी-चिंचवड महापालिका, आळंदी नगरपरिषद तसेच एमआयडीसी अग्निशमन दलाचीही मदत मागविण्यात आली. त्यानंतर विविध अग्निशमन यंत्रणांच्या जवानांनी घटनास्थळी पोहोचून चारही बाजूंनी आगीवर पाण्याचा जोरदार मारा सुरू केला.

पीएमआरडीएचे सहाय्यक केंद्र अधिकारी एल. व्ही. बेदरे आणि चाकण एमआयडीसी केंद्राचे अग्निशमन अधिकारी व्ही. व्ही. तांडेल यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. पीएमआरडीएचे जवान दिग्विजय नलवडे, साईनाथ मोरे, अभिषेक पवार, शुभम पोटे, केतन आवसरमल, उमेश फाळके, ओमकार रणवरे आणि शंतनू गायकवाड यांच्यासह विविध अग्निशमन दलांच्या जवानांनी घटनास्थळी सातत्याने पाण्याचा मारा करत आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले.

आगीची तीव्रता मोठी असल्याने तसेच आजूबाजूला अनेक औद्योगिक कंपन्या असल्याने आग आणखी पसरू नये, हे अग्निशमन दलासमोरील प्रमुख आव्हान होते. जवानांनी आगीच्या केंद्रबिंदूवर नियंत्रण मिळवतानाच लगतच्या कंपन्यांकडे आग पसरणार नाही, यासाठी विशेष खबरदारी घेतली. चारही बाजूंनी पाण्याचा मारा करत आगीला रोखण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली.

अग्निशमन दलाच्या जवानांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे आगीवर काही वेळात नियंत्रण मिळविण्यात आले. आग लगतच्या कंपन्यांमध्ये पसरली असती तर मोठ्या प्रमाणावर औद्योगिक नुकसान होण्यासोबतच जीवितहानीचा गंभीर धोका निर्माण झाला असता. मात्र, अग्निशमन दलाच्या वेळीच केलेल्या कारवाईमुळे हा धोका टळला आणि परिसरातील नागरिकांसह उद्योजकांनीही सुटकेचा निःश्वास सोडला.

अथक प्रयत्नांनंतर आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविण्यात आले. या दुर्घटनेत कंपनीतील साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची शक्यता आहे. मात्र, नेमके किती आर्थिक नुकसान झाले, याचा तपशील अद्याप समोर आलेला नाही. तसेच आग नेमकी कोणत्या कारणामुळे लागली, याचेही कारण स्पष्ट झालेले नाही. आगीच्या कारणाचा आणि झालेल्या नुकसानीचा अधिक तपास संबंधित यंत्रणांकडून करण्यात येत आहे.

# दुचाकी चोराला गुन्हे शाखेचा दणका; तीन गुन्हे उघड!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड शहरात वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी गुन्हे शाखेने कारवाईचा धडाका सुरू केला आहे. गुन्हे शाखा युनिट-३ च्या पथकाने धडक कारवाई करत एका सराईत दुचाकी चोराला अटक केली असून, त्याच्याकडून चोरीच्या तीन दुचाकी जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे चिखली पोलीस ठाण्यातील दोन आणि दापोडी पोलीस ठाण्यातील एक असे एकूण तीन दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत सुमारे १ लाख ७५ हजार रुपये आहे.**




पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या निर्देशानुसार गुन्हे शाखेकडून चोरीच्या गुन्ह्यांचा समांतर तपास सुरू होता. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट-३ चे पथक दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करत असताना ८ सप्टेंबर रोजी पोलीस अंमलदार अजित रुपनवर आणि त्यांच्या सहकाऱ्यांना एका सराईत आरोपीबाबत गोपनीय माहिती मिळाली.

चिखली येथील घरकुल परिसरात एक रेकॉर्डवरील आरोपी चोरीच्या दुचाकींची विल्हेवाट लावण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी घरकुल परिसरात सापळा रचला. संशयित आरोपी तेथे येताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव जॉर्डन राजेश साळवे (वय २०, रा. घरकुल, चिखली) असे सांगितले.

आरोपीच्या ताब्यात असलेल्या होंडा ॲक्टिव्हा (एमएच १४ एफक्यू १६८३) या दुचाकीबाबत पोलिसांनी विचारणा केली असता त्याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी सखोल चौकशी केल्यानंतर त्याने सदर दुचाकी चिखली परिसरातून चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी अधिक तपास केला असता त्याने आणखी दोन दुचाकी चोरी केल्याची माहिती समोर आली.

आरोपीने रुपीनगर परिसरातून हिरो स्प्लेंडर (एमएच १४ जीझेड १२३७) ही दुचाकी चोरी केल्याचे कबूल केले. तसेच दापोडी परिसरातून आणखी एक स्प्लेंडर मोटारसायकल चोरी केल्याचीही त्याने कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून चोरीच्या तिन्ही दुचाकी जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे चिखली पोलीस ठाण्यात दाखल असलेले दोन आणि दापोडी पोलीस ठाण्यात दाखल असलेला एक असे एकूण तीन गुन्हे उघडकीस आले आहेत.

शहरातील दुचाकी चोरीच्या घटनांचा तपास करताना गुन्हे शाखेच्या पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. त्यानंतर चौकशीत त्याच्याकडून चोरीच्या दुचाकींची माहिती मिळवून त्या हस्तगत करण्यात आल्या. या कारवाईमुळे दुचाकी चोरीच्या आणखी काही घटनांचा उलगडा होण्याची शक्यता असून, आरोपीच्या इतर साथीदारांचा किंवा त्याने यापूर्वी केलेल्या गुन्ह्यांचा तपास पोलीस करत आहेत.